**Estd 1962**

**Naac 'A++' Grade**

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# दि.१४/२/२०२२

कोविड–१९ च्या प्रादुर्भावामुळे शिवाजी विद्यापीठाच्या ऑक्टोबर २०२१ हिवाळी सत्राच्या एकुण ६६४ अभ्यासक्रमाच्या परीक्षापैकी विद्यापीठस्तरावरील ३६२ परीक्षांपैकी काही परीक्षांना आज दि.१४ फेब्रुवारी २०२२ पासून ऑनलाईन पध्दतीने सुरळीतपणे सुरवात झाली. या परीक्षा अत्यंत सुरळीतपणे व निर्विघ्नपणे पार पडाव्यात यासाठी विद्यापीठ परीक्षा विभागाने सर्वोतोपरी तयारी केली होती. या सर्व परीक्षेसाठी एकुण **१,२८,०००** इतके विद्यार्थी परीक्षा देणार आहेत. सर्व संबंधित विद्यार्थ्यांना यापूर्वीच एसएमएस द्वारे परीक्षेसाठीचे लॉगिन आणि पासवर्ड पाठविण्यात आले आहेत. तसेच सर्व परीक्षांची वेळापत्रके विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहेत. ऑनलाईन परीक्षेमध्ये काही तांत्रिक अडचण उद्‌भवू नये यासाठी विद्यार्थ्यांच्या तांत्रिक अडचणीचे निराकरण करणेसाठी विद्यापीठ तसेच सॉफ्टवेअर पुरवठादार कंपनीची यंत्रणा कार्यरत ठेवण्यात आली आहे.

आज दि. १४ फेब्रुवारी २०२२ रोजी B.Tech. in Electronics & Telecommunication, Computer Science, Chemical Engineering, Civil Engineering, Mechanical Engineering etc या अभ्यासक्रमाच्या परीक्षा पार पडल्या. आजच्या **परीक्षेसाठी १२८८** विद्यार्थ्यांपैकी **१२८७** विद्यार्थ्यांनी ऑनलाईन पध्दतीने परीक्षा दिली.

या परीक्षेपासून विद्यापीठाने परीक्षेत गैरप्रकार करणा—या विद्यार्थ्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी प्रॉक्टरींग पध्दत सुरु केली आहे. यासाठी विद्यापीठाकडून विशेष पथक नेमण्यात आले आहे. सदर पथकाकडून आज कामकाज करुन प्रत्यक्ष हेडफोन वापरुन गैरप्रकार करणा—या, अन्य मोबाईल वापरुन इतरांशी दूरध्वनीवरुन बोलणारे, एकाच फ्रेममध्ये दोन विद्यार्थी दिसणारे इ. अशा विद्यार्थ्यांवर गैरप्रकार म्हणून प्रत्यक्ष नोंद करुन परीक्षा प्रमाद समितीमार्फत नियमानुसार कारवाई विद्यापीठामार्फत करण्यात येणार आहे. तसेच परीक्षेचे पावित्र्य राखण्यासाठी विद्यार्थ्यांनी दिलेल्या सूचनाप्रमाणेच ऑनलाईन परीक्षा द्यावी, असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक श्री.गजानन पळसे यांनी दिली.